ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
षय बा० वा०
. क्र. १६

# महादजी शिंदे

BVBK-0400016

बा. वा.
नों. क्र. १८

म. ग्रं. सं. ठाणें, व्याख्यानमाला शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
ग्रा. क्र. १८ ...... दिनांक ........
विषय बा.वा. ... क्र. ........

# महादजी शिंदे

पु. पां. गोखले

BVBK-0400016

मूल्य एक रुपया वीस पैसे

इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पुणें

प्रकाशक
शाम दयार्णव कोपर्डेकर
इंद्रायणी साहित्य,
१२५७ सदाशिव पेठ, पुणे ६

© पु. पां. गोखले

प्रथम मुद्रण
२६ जानेवारी १९७५

मुद्रक
शशिकान्त महादेव देव
सुलभ मुद्रणालय,
३९१ शनिवार पेठ, पुणे ३०

## पा टी ल बा बा

मुगुटमणी ते पाटीलबाबा ।
कोठवर त्यांचा प्रताप गावा ? ।
नवस नवसिता फळास यावा ।
हरहमेशा शत्रुसि दावा ।
माहित सगळा मराठि कावा ।
हुशार फौजा लढाई लावा ।
जिंकुनि हिंदुस्थान परतले ॥

— शाहीर प्रभाकर

# महादजी शिंदे

सातान्याच्या पूर्वेस पंधरा मैलांवर कण्हेरखेड नावाच्या खेड्यातील शिन्दे घराणे, हे बहामनी राज्याच्या काळापासून शिलेदार म्हणून प्रसिद्ध होते. औरंगझेबाच्या पदरचे मनसबदार म्हणूनही शिन्दे मंडळी होती. म्हणूनच त्या बादशहाने शाहूशी त्यांची सोयरीक करून दिली होती. याच कुळातील राणोजी शिन्दे बाळाजी विश्वनाथ पेशव्यांच्या पदरी एक बारगीर होता. माळव्यात बाजीरावाने केलेल्या लढायांत राणोजीने पराक्रम गाजविल्यामुळे, माळव्यातील चौथाई–सरदेशमुखी गोळा करण्याच्या कामगिरीवर बाजीरावाने पवार–होळकराप्रमाणेच शिन्दे सरदाराला नियोजिले. राणोजी शिन्दे १७४५ मध्ये निवर्तले.

प्रसिद्ध मराठी वीर व मुत्सद्दी महादजी शिन्दे हे राणोजींना त्यांच्या रजपूत रमणी चिमाबाईपासून १७२७ त झालेले सुपुत्र होत. राणोजीच्या पाठीमागे बरेच दिवस महादजी खुद्द पेशव्यांच्या खाजगी पागेत होते. ते आपल्या भावाबरोबर लहानपणापासूनच मोहिमांवर जात. त्यामुळे त्यांना युद्ध-शास्त्राचे शिक्षण सहजच मिळाले होते. नानासाहेब पेशव्यांच्या संगतीने महादजी मुत्सद्दीपणातही तरबेज झाले होते.

महादजींनी प्रथम तळेगाव–उंबरीच्या निजामावरील लढाईत शौर्य गाजवून नाव मिळविले. त्यानंतर औरंगाबाद ( १७५१ ), साखरखेडले ( १७५६ ), पंजाब ( १७५९ ) वगैरे मोहिमांत त्यांनी भाग घेतला, तसाच १७६१ च्या पानिपतातही भाग घेतला, पानिपतच्या शेवटच्या दिवशी जेव्हा उरलेले लोक परतले, तेव्हा महादजीही दक्षिणेत आले. त्या वेळी ते शत्रूकडून लंगडे झाले असता, राणेखानाने त्यांना सुखरूप आणले.

गोहदच्या जाटावर राघोबादादाने स्वारी केली, तेव्हा महादजी शिंद्यांनी दौलतीतर्फे मुख्य म्हणून कामगिरी केली. राघोबाच्या फितव्याचा बंदोबस्त थोरल्या माधवरावाबरोबर राहून महादजींनी केल्यामुळे, पेशव्यांनी त्यास सर्व हुजूरपागेचा सेनापती करून जहागीरही दिली. पानपतचे अपयश धुऊन काढण्यासाठी निघालेल्या मोहिमेत महादजींनी नजीबखानाचा प्रांत फस्त केला व शहाअलम बादशहास इंग्रजांच्या हातून

सोडवून दिल्लीस त्याची स्थापना केली. इंग्रेजांशी झालेल्या लढायात त्यांच्याकडील कवायतीपद्धतीचा उपयोग पाहून, महादजींनी फ्रेंचांना चाकरीस ठेवून तोफा ओतविण्याचे व हत्यारे तयार करण्याचे कारखाने काढले, आपली कवायती पलटणे तयार केली व मराठ्यांचे वर्चस्व पुन्हा प्रस्थापित केले.

महादजींनी बादशहाकडून पेशव्यास वकील-इ-मुतलकचे पद व स्वतःला त्या पदाची नायबगिरी मिळवून साऱ्या बादशाहीत गोवधाची मनाई करविली. बादशहास दरमहा पासष्ट हजारांची नेमणूक करून देऊन पाटीलबाबांनी दिल्लीची सारी पादशाहीच १७८५ मध्ये हाती घेतली. नाना फडनविसाच्या मुत्सद्दीपणाने आणि पाटीलबाबांच्या शौर्याने सतलज-पासून तुंगभद्रेपर्यंत मराठी साम्राज्य पसरून साऱ्या हिंदुस्थानभर त्याचा दरारा बसला होता. शिवाजी व बाळाजीपंत नाना यांच्या मागे महादजीच कर्ता, शूर, मुत्सद्दी व गुणांचा चाहता.

शके १७१५ माघ वद्य १३ रोजी नवज्वर होऊन पुण्याजवळील वान-वडी येथे वयाच्या ६७ व्या वर्षी ह्या कर्तबगाराला स्वर्गवास घडला. त्याची छत्री वानवडीसच आहे. राज्यांची आयुष्ये त्यातील लोकांच्या शहाण-पणावर, पराक्रमावर व गुणांवर अवलंबून असतात.

✿

## तळपत्या तिखट तलवारी

निजामशहा सलाबतजंग. रामदासपंत म्हणून एक कर्नाटकी ब्राह्मण त्याचा दिवाण. त्याने कोल्हापुरच्या ताराबाईकडे संधान बांधून, पुण्याच्या भट पेशव्यास उडविण्याचे कारस्थान रचले, ते यश पावल्यास आपल्या पुतण्याला पेशवाई मिळावी अशी तो अपेक्षाही करीत होता.

सन १७५० मध्ये दाभाडे, गायकवाड, बाबूजी नाईक व सातारचे प्रतिनिधिमंडळ पेशव्यांचे विरुद्धच होते. शिंदे होळकर फौजेसह दिल्लीकडे गुंतले होते. अशा वेळी निजामाने फ्रेंचांची मदत घेतली. पुण्यावर स्वारी केली. वाटेत गावे जाळली, मुलूख बेचिराख केला. त्याच वेळी ताराबाईंनी आपला दमाजी गायकवाड साताऱ्यावर पाठविला होता. त्याला पेशव्यांनी केले कैद ! ते आता निजामाशी सामन्याला उभे राहिले !

एके दिवशी चंद्रग्रहण होते. सगळे हिंदु स्नान करीत होते. त्या वेळी शत्रूने डंख केला. लूटच लूट मिळवली ! मोंगलानी केलेला हा अपमान दत्ताजी व महादजी शिन्दे वगैरे मंडळींना खपला नाही; तो त्यांना चांगलाच खुपला. दुसऱ्याच दिवशी महादजी वगैरे अकरा मराठी रुद्र मोंगलांची चांगलीच खोड मोडून बसले. मोंगलांकडील सैन्य रांजणगाव व ढमढेऱ्यांचे सैन्य तळेगाव घेऊन पुढे आले. उंबरीवर लढाई झाली. मोंगल हरले. महादजी, पेशव्यांचा एक बारगीर. तोही खाजगी पागेत. वयाने केवळ तेवीस वर्षांचा ! त्याची तलवार या लढाईत प्रथमच तळपली ! आणि ? आणि पेशव्यांसह सर्वांच्या डोळ्यावर आली, डोळ्यात भरली.

## बिजलीचा लखलखाट

पेशवे व दक्षिणचा सलाबतजंग यांचे १७५६ त चांगलेच फाटले ! पेशव्यांनी आपला वडील मुलगा विश्वासराव यास फौजा देऊन गोदावरीच्या

थंडीत पाठविले. विश्वासरावाबरोबर दत्ताजी, महादजी, तुकोजी व जानकोजी शिन्दे आपापल्या फौजफाट्यासह होते.

शिंदखेडचे रामचंद्रराव जाधवराव मोठ्या फौजेनिशी पेशव्यांच्या फौजेवर तुटून आले. त्यांचा पिच्छा पुरवून शिंद्यांनी पाठलाग केला. शिंद्यांनी जाधवरावास शिंदखेडासच घेरले.

इतक्यात ! निजामअली मोठी फौज घेऊन आला. निकराची लढाई झाली. महादजी शिंद्यांची तलवार आपले पाणी बिजलीच्या लखलखाटाने दाखवून बसली.

मग साखरखेडली येथे तह झाला. त्यात पेशव्यांना पंचवीस लाखांचा मुलूख मिळाला.

## कठिण समय येता, कोण कामास येतो ?

कौरव पांडव– संगरताण्डव द्वापरकाली होय अती ।
तसे मराठे– गिलचे मोठे कलीत लढले पानपती ॥

आणि १७६१ च्या त्या घोर संग्रामात मराठ्यांचे दोन मोती गेले, पंधरा मोहरा हरपल्या, खुर्दा तर किती गेला, पत्ता नाही ! महादजी शिंदे व नाना भानू शेवटपर्यंत पानपतावर होते. इब्राहिम खान गारद्याच्या हाताखालील फ्रेंच शिक्षित लष्करापासून बाजारबुणग्यापर्यंत आणि स्वतःच्या जिद्दीने लढणाऱ्या शिन्दे बन्धुपर्यंत सर्वांचे रणकौशल्य त्यांनी पाहिले होते.

चौतीस वर्षांचे धुरंधर त्या वेळी महादजी होते. नानासाहेब पेशव्यांपासून 'सावधपणे अष्टपैलू' व्हावयाचे धोरण ते शिकले होते. त्यामुळे पानपतावर रणांगणाचे अचूक धडे त्यांनी घेतले. माणसाने 'मान तुटेल, पण इमान पटेल' असेच वागले पाहिजे. हा धडा त्यांनी इब्राहीमखान गारद्यापासून आणि समशेरबहाद्दरापासून घेतला. 'विवेकसिंधूचा पोहणार तो कुबुद्धिकूपी कसा बुडणार ?' हा धडा त्यांनी सदाशिवरावभाऊपासून घेतला. आणि सर्वांच्याचपासून ते शिकले की माणसाचे मन, मेंदू व मनगट

बळकटच पाहिजे; तरच काळाची शेंडी धरण्याची माणसाची ताकद संपर्कात येणाऱ्या माणसांच्या पारखेने कारणी लागते.

अशा खूणगाठी मनाशी बांधूनच महादजी पानिपतावरून पळत सुटले. त्यांच्या पाठीस अहमदशहा अब्दल्लीचा एक पठाण निकराने लागला होता. महादजींच्या सुंदर व चपळ घोडीवर त्या पठाणाची नजर होती. ती घोडी एका नाल्याजवळ आली. नाल्यावरून उडी मारू लागली. पण नेम चुकला ! ती घोडी व महादजी नाल्यात धडपडले. इतक्यात पठाणाने महादजींच्या डाव्या पायावर सांगेचा वार केला ! ! महादजी जन्माचे लंगडे झाले ! पठाणाने महादजींची घोडी व त्यांचे अंगावर मिळाले ते लुबाडले. अन् ? सरळ रस्ता सुधारला.

महादजी विव्हळत पडले होते. मराठ्यांचा एक भिस्ती राणाखान याने महादजींचे विव्हळणे ऐकले. त्याने महादजीस बैलावर घातले. दक्षिणेकडे चालवले. महादजींनी राणाखानाला विचारले– "तुला माझी जवळीक कशी ?"

राणाखान उत्तरला–" बचेंगे तो और भी लढेंगे " म्हणून जीवखाऊ जखम झालेल्या स्थितीतही शत्रूला सांगणाऱ्या दत्ताजी शिंद्यांचा तू भाऊ ना ? मालकांची पादत्राणे छातीवर घेऊन निजणाऱ्या निष्ठावंत राणोजी शिंद्यांचाच तू मुलगा ना ?

" होय ! " महादजी उत्तरले.

" अरे मग तुझ्यासारखीच माणसे मराठेशाहीचे खांब आहेत. थोरल्या छत्रपतीला हवी असलेली हिंदुपदपादशाही बाजीराव बाळाजी, चिमाजी-अप्पा, सदाशिवरावभाऊ, विश्वासरावानी स्थायी करावयाचे मनावर घेतले, ते तुमच्यासारख्यांच्या पराक्रमी आधारावरच ! ' घालूनि अकलेचा पवाड । ब्रह्मांडाहूनि व्हावे जाड ।। ' अशा तोलाची तुम्ही माणसे. हेच आमचे जिव्हाळे. स्वराज्याचेही जिव्हाळे तुम्हीच की रे ! ! नाना भानू अन् महादजी शिंदे यांच्या तोंडाकडेच आता मराठेशाही पहात आहे. "

महादजी गहिवरले. ते म्हणाले–" यार राणाखान, तुझ्यासारखा भाऊ तरी मला आता आहे कोठे ? "

## फकिरी दौलत

नानासाहेब पेशव्यांनी पानिपतची हाय घेतली. पुढे व्हायचे तेच झाले. पण त्यामुळे उत्तरेतील गडबडी थांबल्या होत्या असे नव्हे. म्हणून राघोबा-दादांनी माळव्यात विठ्ठल शिवदेव व नारोशंकर यास रवाना केले. पैकी विठ्ठल शिवदेव यास राघोबांनी पत्राने कळविले की– "महादजी व त्याचा पुतण्या केदारजी शिन्दे याना पाठविले आहे. त्यांचेही स्वरूप दाखवून उपयोगी पडेल ते करावे. सांप्रता शिंद्यांच्या जागी तेच आहेत."

या वेळी महादजीस माळव्याची विशेष माहिती नव्हती. त्याने स्वतःवर सोपविलेली कामगिरी केली. पण तो माळव्यातून परतला निरुत्साही ! आणि तरीही या संधीसच त्याला चतुर्भुज होण्याचा योग आला.

बीड येथील सुलतानराय निंबाळकरांची भाची अन्नपूर्णा त्याला सांगून आली. लग्न जमले व पार पडले. निंबाळकरांनी महादजीस परगणे जामखेड यातील खडेपरडोह हा गाव आंदण दिला, या गावाजवळच रायमोह या गावी एक मुसलमान अवलिया रहात असे. तो मोठा साधु होता. महादजी त्याची सेवा करू लागले. कारण शिंद्यांची सरदारकी आपणास आपल्या गुणाच्या पात्रतेने मिळावी अशी महादजींची इच्छा होती. "तुझी इच्छा सफल होईल." असा आशीर्वाद त्या अवलियाने दिला. महादजींनी साधुस मोठे उत्पन्न करून दिले आणि सांगितले की सरदारकी मिळाली तर ती मी "फकिरी दौलत" म्हणेन व मानीन.

## पानिपतचा पराजय पुसू लागला !

पानिपतावर महाराष्ट्राची लाख बांगडी फुटली. पुण्याचे नानासाहेब पेशवे दिवंगत झाले. त्यांचे सतरा वर्षांचे चिरंजीव माधवराव, सातारकर छत्रपतींनी पेशवाईची वस्त्रे त्यांना दिली. कारभार पहात होते त्यांचे चुलते राघोभरारी अटकेपार झेंडे लावणारे.

राणोजी शिंद्यांची सरदारी कोणाला द्यायची ? याचा विचार १७४५ पासून रेंगाळत होता. महादजी शिंद्याना ती द्यायला राघोबादादांचा विरोध होता. कारण शिन्दे घराण्यातील ते विदुर नव्हते काय ?

पण माधवरावांना मनुष्य पारख होती, राजकारणाचा व्यवहार कळत होता आणि मराठेशाहीचा पानपतावर ढासळलेला डोलारा त्यांना सावरावयाचा होता. त्यांनी स्पष्ट निर्णय घेतला की—

" हिंदुस्थानातल्या निरनिराळ्या प्रांतात वेळोवेळी राजकारणी हिंडल्याकारणाने महादजी अनुभव ज्ञानी आहेत. लहानपणापासून स्वारीत दिवस काढल्या कारणाने महादजी शूर, उद्योगी, प्रसंगावधानी, विरोधकावर मात करण्यात चतुर व दूरदर्शी झाले आहेत. शिन्दे सरकारची दौलत हिंदुस्थानातच असल्यामुळे त्याला त्या प्रांतातील विकट वाटा, अडचणींची अडणूकीची व अडवणूकीची स्थळे ठाऊक आहेत. रजपूतांचा एकदम तुटून पडण्याचा स्वभाव, जाटांचे शौर्य, रोहिल्यांचे कपट, दिल्लीकडील लबाडीची कारस्थाने ते पक्केपणी जाणतात. तेव्हा त्यांनाच सरदारकी...."

महादजीचे ऐश्वर्य वाढले. माळव्यात ते स्थिर व भारी झाले ! मेवाड-उदेपूरचे रजपूतास त्यांनी जरब बसवली. हुजूरपागावर मुख्य सरदार महादजी झाले.

पानिपतचा मुकाबला व्हायलाच पाहिजे, असे माधवराव पेशव्यांचे मनाने घेतले. म्हणून विसाजी कृष्ण बिनिवाले व रामचंद्र गणेश कानडे, हुजूरपागेच्या लोकासह महादजी शिन्दे व तुकोजी होळकर यांना घेऊन नर्मदा उतरले. माळव्यात हजर झाले.

पानिपत झाल्यापासून जयपूर—जोधपूरचे रजपूत खंडणी देईनासे झाले होते. त्यांच्या पारिपत्यास मराठे लागले. खंडणीची बाकी भराभर वसूल झाली. तेथून भरतपुरावर स्वारी झाली. जाटांचा समाचार घेतला. या कामी दिल्लीचा नजीबखान आपोआपच सहकारास आला.

ही सहकाराची गोळी महादजीस कडूच होती. पानपतचे सर्व संकट नजीबखानाच्या मसलतीने ओढवले होते. मराठ्यांचा नाश करण्यात तो पुढाकार घेऊन होता. शिंद्यांच्या घराण्याशी त्याने हाडवैर केले होते. त्याची व रोहिल्याची पाळेमुळे खणून काढल्याशिवाय, महादजीच्या हृदयाची जखम

बरी होणारी नव्हतीच!! तरीही.... नजीबखान शहाअलम बादशहाच्या नावानेच दिल्लीची गादी चालवीत होता. भरतक्षाजवळ मराठे तळ देऊन आहेत हे शहाअलमला कळले. त्याने आपला एक सरदार सुजाउद्दौला मराठ्याकडे पाठविला. दिल्लीच्या तक्तावर स्वतःस बसविण्याची विनंती केली. या मसलती चालू असताच नजीबखान १७७० च्या आक्टोबरमध्ये दुआबात एकाएकी अल्ला घरी गेला. प्याद्याचे फर्जी झाले होते ते संपले! त्याचा मुलगा सबेतखान याने बादशहाची नेमणूक बंद केली. मग बादशहाचा संताप काय विचारावा? रोहिलखंडावर स्वारी घालावयाचे ठरले!!

पेशव्यांची फौज अंतरवेदीत उतरली. सबेतखान उत्तरेकडे शुकताल किल्ल्यात सूबाल्या ठोकून बसला. मराठ्यांचा घोडा दिसला की रोहिलखंडातील गावच्यागाव पळू लागले. "चलो दिल्ली"ची घोषणा मराठ्यांनी केली. शहाअलम अलाहाबादेत होता. त्याने इंग्रजांचा निरोप घेतला. तशी अटच मराठ्यांनी घातली होती. त्याला पोहोचविण्यास अयोध्येचा नबाब व इंग्रजांचा जनरल बेकर आपापल्या हद्दीपर्यंत आले होते. बादशहाची स्वारी पावसाळ्याचे सुमारास फरुक्काबाद येथे आली. तेथे बादशहाने मराठ्यांशी करार केला की—

(अ) महंमदशहापासून थकलेली चौथाई मराठ्यास द्यावी. (आ) रोहिलखंडात व अन्य ठिकाणी जेथे जेथे बादशहाची फौज व मराठ्यांची फौज जाईल तेथे तेथे मिळालेल्या लुटीत दोघांचा सारखा हिस्सा असावा. (इ) बादशहा दिल्लीत जाताच मराठे सरदारांच्या जहागिरी पूर्वीप्रमाणे सुरू कराव्या. (ई) जाटाशी लढण्यासाठी बादशहाने पाच लाख रुपये तावडतोब मराठ्यास द्यावेत.

मग महादजी शिंद्यानी फरुक्काबादहून २५ डिसेंबर १७७१ रोजी बादशहास दिल्लीत इतमामाने प्रवेशविले.

नंतर बादशाही सैन्यासह महादजी शिंदे रोहिल्यावर तुटून पडले. शुक्रताल, फत्तरगड, घोसगड हे बळकट किल्ले हां हां म्हणता खाली आले. पानिपतात मराठ्यांची जी संपत्ती रोहिल्यांनी लुटली होती, ती मराठ्यांच्या हाती परत आली. महादजींनी दुआबातच मुक्काम ठोकला. आणि? "कोण मला वठणीला आणू शकतो, ते मी पाहे." असेच जणू जगाला सांगितले.

पानिपतावर मराठ्यांचा पराभव झाला होता. पण तो गिलच्यांच्या विजयापेक्षा प्रभावी ठरला. गिलच्यांनी व हिंदुपदपादशाहीच्या शत्रूंनी मराठ्यांची एवढी धास्ती घेतली होती की पुन्हा मराठ्यांच्या वाटेस जाण्यास गिलचे धजावणारच नाहीत, असा आत्मविश्वास मराठ्यांना आला होता. महादजी शिन्दे हे त्या आत्मविश्वासाचे प्रतीक होते.

## पाचामुखीचा परमेश्वर मानला

सरदारकी मिळाल्यावर पाटीलबावांनी "फकिरी दौलती"ची व्यवस्था उत्तम लावली. एवढ्यात उदेपूरचा राणा राजसिंह हा मरण पावला. गादीबद्दल वाद निघाला. दोन्ही पक्षानी पाटीलबावास मदतीस बोलावले. राजसिंहाचा चुलता याने गादी बळकावली. प्रजेला ते रुचले नाही. त्यांनी राणा रतनसिंगाची गादीचा वारस म्हणून घोषणा केली. पाटीलबावांनी पाचामुखीचा परमेश्वर मानला. त्यामुळे रतनसिंगाचा जय झाला. पाटीलबावास मोठी खंडणी व दोन परगणे मिळाले.

## बारभाईस पाठिंबा

श्रीमंत मातुश्री (गंगाबाई– नारायणराव पेशवे पत्नी) बाईसाहेब, सेवेसी—

विनंति सेवक महादजी शिंदे कृतानेक विज्ञापना. (२७ एप्रिल १७७४) तागाईत चंद्र १५ सफर, मुक्काम उज्जैन जाणोन वर्तमान यथास्थित असे. विशेष–आपण दोन पत्रे चंद्र १७ व चंद्र २७ मोहरमची पाठविली, ती चंद्र ७ सफरी पावली. तीर्थस्वरूप (राघोबादादा साहेब) यानी त्र्यंबक विश्वनाथ (पेठे) यास दगा करून धरले. उपरांत सरकारची फौज व भोसले

व मोगल कूच करून तीर्थस्वरूपावर गेले. तीर्थस्वरूप पळत पळत खानदेशातून जाऊन नर्मदापार होतील. सरकारची फौज व भोसले व मोगल पाठलागावर आहेतच. तुम्ही व होळकर एक होऊन, नर्मदापार झाल्यास हस्तगत करावे. न बनल्यास रूख ( रोख ) चुकवून इकडे सत्वर येणे, म्हणोन आज्ञा.

ऐसियास मामा ( पेठे ) नी उतावळी करावयाची नव्हती. असो. होणारासारखी मामास बुद्धि जाहली. याउपरी आळा घाली असा सरदार पाठलागावर फौज आहे त्यात असोन, मोंगल व भोसले एक विचारे मजबूतीने वर्तेत, असे करावे. येथील वोढी ( आर्थिक अडचणी ) चा प्रकार किती लिहावा ? परंतु श्रीमंत खानदेशात आले, स्वारीपुढे येईल, याजकरिता चंद्र १२ रोजी डेरे दाखल जाहले. ( तोंड देण्यास आम्ही निघतोच ! ) असो. श्रीमंत नर्मदा उतरणार नाहीत. वरकड सविस्तर अर्थ राजश्री सखारामपंत बापू व राजश्री बाळाजीपंत नाना यांचे पत्री लिहिले आहे. विनंती करतील. सेवेसीश्रुत होय हे विज्ञापना.

## शेवटचा दक्षिण दिग्विजय

माधवराव पेशवे थेऊरला देवाघरी गेले. मराठी सत्तेला तो प्रचंड आघात होता. महादजी शिंद्यांच्या डोळ्याचे पाणी खळले नाही. माधवरावांनी आपणास योग्यतेस चढविले, सुभेदारी दिली याची कृतज्ञ आठवण महादजी बावांना सदैव होती.

माधवरावांच्या नंतर राघोबादादांच्या कारस्थानास ऊत आला. केंद्रसत्ताच दुर्बल झाली. नारायणराव पेशवे यांचा खून झाला. या गोंधळाचा फायदा हितशत्रूंनी घेतला तर नवल काय ? इंग्रजांचे पाऊल स्वराज्यात घुसले. पेशवे-दरबारात काय घडामोडी चालल्या आहेत हे महादजी शिन्दे सूक्ष्म दृष्टीने पहात होते. इंग्रजांनी तेवढ्यात राघोबास साथ देण्याकरता साष्टी घेतली. पण १७ फेब्रुवारी १७७५ रोजी राघोबाचा महीनदीच्या काठी मराठा सैन्याने पराभव केला. राघोबाच्या बखेड्यात भर घालण्याकरताच जणू,

पानिपतावर पडलेल्या सदाशिवराव भाऊ पेशव्याच्या तोतयाचे बंड आले. पण इंग्रजांचा वकील अप्टन् याच्या देखतच मराठी दरबारने तोतयाला देहान्ताची शिक्षा दिली. या कडक कारभारानंतर इंग्रजांनी राघोबाची बाजू सोडली. मराठ्यास भडोचचा तीन लाखांचा मुलूख व साष्टी परत दिली.

पुणे दरबारातील अशांततेचा फायदा कोल्हापुरकरांनी हैदर व निजाम याशी संगनमत करून उठविला. त्यांनी पटवर्धनी मुलखावर स्वारी केली. ती मोडण्यास महादजी शिंदे गेले. कोल्हापुरावर तोफांचा भडिमार झाला. कोल्हापुरकरांनी तह केला. पटवर्धनी मुलूख सोडला. लढाईच्या खर्चाबद्दल पंधरा लाख रुपये पुणेदरबारास दिले. महादजी शिंद्यानी दक्षिणेतील केलेली ही शेवटचीच लढाई.

## लेखणी गुरुचरणी

मल्लाप्पा वासकर हा वारकऱ्यांतील एक प्रसिद्ध फडकरी. लिंगायत वाणी, पण वाणीचा कणखर व हिशोबाला चोख.

महादजी शिंद्यांचा मुक्काम एकदा पंढरपुरी पडला. तेव्हा ते मल्लाप्पांच्या भेटीला सहजच गेले. नमस्कार चमत्कार झाले. समाचार घेतले गेले. मग शिंद्यांनी आपले एक बाड मल्लाप्पांच्या पुढे ठेवले. विनवलेही की "एकवार यावर नजर टाकावी."

मल्लाप्पांनी सहज काही पाने चाळली व उलटली. म्हणाले— "अक्षर-ब्रह्म केवळ लेकुराच्या गोष्टी नाही! माझ्यापुढे तुकाराम महाराजांच्या अभंग-पंक्ती कशा नकलून आणल्यात ते का मला दाखवता आहात सरदार? अहो, यात ओळ न् ओळ 'तुका म्हणे' आहे. 'सरदार महादजी सांगे' असे यात काय आहे?"

आजपर्यंत त्यांना असे कोणी बोललाच नव्हता. ज्याने ज्याने ते बाड पूर्वी पाहिले होते, त्यांनी त्यांनी महादजी शिंद्यांना तुकाराम–महाराजांच्या तोडीचे कवी ठरविले होते! पण आज त्यांना एक रामशास्त्री भेटला. तेव्हा

महादजी ओशाळले.

त्यांनी मल्लाप्पा वासकर यांना गुरू केले. महादजींनी साहित्यशर्विलकी केली नव्हती. ते वाङ्मयचौर्य नव्हते. पण तुकाराम–वाङ्मयाशी ते एवढे समरस झाले होते की दुजेपणाला तेथे वावच नव्हता. पण पाठांतरपटुता म्हणजे साहित्यनिर्माण नव्हे. महादजींना हे कळून चुकल्याबरोबर त्यांनी आपली लेखणी गुरुचरणी वाहिली.

## देशद्रोही कुत्ते

औरंगझेबानंतर दिल्लीची मोंगल बादशहात म्हणजे तंट्यावखेड्यांचा गप्पागोंधळच होता. त्याच्यामागून बहादूरशहा, जहांदरशहा झाले. पुढे फरुकशिअरची पाळी आली. त्याला गादीवर बसविण्यासाठी सय्यदबंधुंनी मराठ्यांचे सहाय्य मागितले. बाळाजी विश्वनाथ यास मग चौथाई, सरदेशमुखी व स्वराज्याच्या सनदा द्याव्या लागल्या होत्या. हे हक्कच पुढे मोगलाईस भोवले.

पानिपतानंतर बेगुमान झालेल्या रजपुतांची खोड मराठ्यांनी मोडली. त्यांनी आपला तळ दीग किल्ल्याभोवती टाकला. दिल्लीचा कारभार करणाऱ्या नजीबखानाला साफ बुडवावा असा माधवराव पेशव्यांचा व पाटीलबावांचा मनसुबा होता. मल्हारराव होळकर व नंतर तुकोजी होळकर त्या मनसुब्याला विरोधी होते. तेव्हा पाटीलबावा कडाडून बोलले—“ पानिपत बुडले ते नजीबच्या कारस्थानाने. आमच्या घराण्याशी तर त्याचे हाडवैर. रोहिल्यांची पाळेमुळे खणून काढल्याशिवाय जनकोजी शिंद्यांचा आत्मा शांत होणारच नाही ! ”

शुकतालचा किल्ला, महादजी शिंद्यांनी त्याच्यावर तोफांचा माराच मारा केला. किल्ला तर पडलाच, पण सर्व प्रांतच उध्वस्त झाला, तेव्हा झबेताखान रोहिला मुठीत जीव धरून नजीबगडाच्या आश्रयाला गेला. मग मराठे नजीबगडावर तुटून पडले. नजीबगडावर झबेताखानाची बायकामुले मिळाली,

ती मराठ्यांनी कैद केली !

श्वेताखानाच्या पाठीमागे मराठे एवढे हात धुऊन का लागले? महादजी शिंद्यांना श्वेताखानाच्या वडिलांपासून म्हणजे नजीबखानापासून त्या रोहिला कुटुंबाबद्दल चीडच होती. कारण नजीबखान मराठेशाहीचा कट्टा दुष्मन होता. दिल्लीला हिंदुपदपादशाही मराठ्यांना स्थापन करू द्यावयाची नाही, या वेडाने तो पिसाटला होता. अहंमदशहा अब्दालीला त्यानेच हिंदुस्थानात आणले व पानपत केले.

## इंग्रजांचा पराभव

राघोबादादानी इंग्रजांस सहाय्यास बोलावले. इंग्रजांचे सैन्य पुण्याच्या रोखाने सरकू लागले. पाटीलबाबांनी त्या सवारीला उत्तरेत हटकले नाही. ते सरळ पुण्यास आले. नाना फडणविसाचे आसन स्थिर केले, पुण्याच्या चौफेर चौक्या बसवून नाकेबंदी केली; सखारामबापूंनी राघोबास पाठविलेल्या पत्रांची झाडेझडती आपल्या तळावर घेतली आणि सिंहगडावर अटकेत टाकले. तेथेच सखारामबापूचा अंत झाला.

राघोबाचा पक्ष असा खिळखिळा झाला तरी इंग्रज पुण्यावर स्वारी करण्याचा मुहूर्त ठरवून बसले होते. इंग्रजांचे सैन्य पनवेलमार्गे बोरघाट चढून वर येऊ लागले. त्याबरोबर पानसे वगैरे सरदारांनी इंग्रजांना हैराण केले. कार्ले येथील एका चकमकीत कॅप्टन स्टुअर्ट ठार झाला. मराठ्यांनी इंग्रजांची रसदही तोडली ! राघोबाने महादजी शिंद्यांची मदत मागितली. पाटीलबाबांनी आपली दोन माणसे राघोबाकडे पाठवली. पण त्यांच्यावर देखरेख करण्यासाठी ! हताश झालेल्या इंग्रजांनी फार्मर नावाचा वकील तडजोडीसाठी पाठविला.

पुण्याच्या दरबारात फार्मरने इंग्रजांच्या दोस्तीची महती गाइली. पाटीलबाबांनी बजावले–" प्रथम राघोबास आमच्या स्वाधीन करा. फाजील गोष्टी बंद !"

राघोबास महादजींच्या स्वाधीन करण्यात आले. तह झाला. चाळीस

हजारांची खंडणी इंग्रजांनी दिली. तहाची कलमे योग्य रीतीने पाळीपर्यंत दोन इंग्रज अधिकारी ओलीस ठेवण्यात आले. वडगाव येथील इंग्रजांचा हा नाक मुठीत धरून झालेला पराभव अविस्मरणीय ठरला.

## इंग्रजांचा पराभव–२

पावसाळा संपला. १७७८ च्या नोव्हेंबरात इंग्रजांनी चार हजार फौज घेऊन पनवेलच्या वाटेने बोरघाट चढण्यास सुरुवात केली. ही पुण्यावर स्वारी होती. सवाई माधवराव वयात येईपर्यंत राघोबादादाकडे पेशवाईचा कारभार यावा, हे त्या स्वारीचे साध्य होते. रघुनाथराव, अमृतराव वगैरे पेशवे मंडळीसह इंग्रज २३ नोव्हेंबर रोजी बोरघाट चढून घाटमाथ्यावर आला.

पुण्याने इंग्रजांना तोंड देण्याचे ठरविले. २० डिसेंबरच्या सुमारास भिऊराव पानसे, बाजीपंत जोशी व गणेशपंत बेहरे दहा हजार फौज घेऊन वडगाव येथे तळ देऊन बसले.

इंग्रजी फौज कार्ले मुक्कामास पोहोचताच, लढाईला तोंड लागले. तरीही ९ जानेवारी १७७९ रोजी इंग्लिश फौज खडकाळ्यावरून तळेगावला पोहोचली. इंग्रज पुढे येताच मराठ्यांची काही फौज त्यांच्या पाठीवर गेली. इंग्रजी फौजेला आता रसद पोचणे बंद पडले.

इंग्रजांनी शिंदे आणि त्यापेक्षाही होळकर आपल्या बाजूने लढाईस यावेत असा प्रयत्न केला. कर्नाकसाहेबाने पत्रव्यवहारही केला. पण फितुरीच्या प्रयत्नाला यश आले नाही. आपण शिंद्याचे स्वाधीन होण्यास तयार आहो, असा राघोबाचा निरोपही पुण्यास गेला. पण रामा, शिवा, गोविंदा!

ता. ११ जानेवारी रोजी इंग्रजांनी आपल्या तोफा व जड सामान फेकून दिले. रसदबंदीमुळे पोटमारीला तोंड देणे सोपे का होते? मि. फार्मर यास मराठे सरदारांशी सलोख्याचे बोलणे करण्यास पाठविले. कारण तीन दिवसांत उपासमारीने व मराठ्यांच्या निकराने एवढी गळेचेपी झाली होती की शेकडो लोकांची हत्या हताशपणे त्यांना बघावी लागत होती.

ता. १४ जानेवारी रोजी मि. फार्मर, नाना फडनवीस, पाटीलबाबा, हरिपंत फडके यांची पुणे दरबारात भेट झाली. प्रथम राघोबादादा पेशव्यांचे स्वाधीन करा, मग बाकीच्या गोष्टी!!

पेशवे दरबारचा हा आदेश इंग्रजाला मानणेच भाग आले. इंग्रजांनी राघोबास तसे सुनावले. राघोबा महादजी शिंद्यांच्या स्वाधीन झाले.

आता इंग्रजास सुखरूप जाऊ द्यावयाचे. तर महादजी शिंद्यांनी बोलणे लावले की— "लढाई करण्याबद्दल बाऊ दाखवू नका. परंतु ज्या अर्थी कर्नल अप्तन् याने पुरंदर येथे केलेला तह मोडून इंग्रजांनी पेशव्यांचे मुलखावर स्वारी केली व मराठ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान केले, त्या अर्थी याच ठिकाणी नवीन तह केल्याखेरीज इंग्रजांची सुटका नाहीच नाही!"

वडगावला तह झाला. पण शिंद्यांशीही इंग्रजांची सवती ठरोती झाली. शिंद्यांना भडोच परगणा नजर झाला. एकेचाळीस हजार रुपये मुत्सद्दीखर्चाबद्दल दिले. तहाच्या कलमांच्या अंमलबजावणीची हमी म्हणून दोन इसम महादजीकडे स्वखर्चाने ओलीस म्हणून दिले.

शिंद्यांनी आपली फौज देऊन रघुनाथरावास झाशी प्रांतात पोहोचविले. इंग्रज मुंबईस परतले.

## इंग्रजाला शह : सालबाईचा तह

वडगावच्या तहाची शाई वाळली नव्हती. तोच तो तह मोडण्यास इंग्रजांनी सुरुवात केली. गोदर्दसाहेबाच्या फौजेस पुढेच कूच करण्यास सांगितले गेले. त्यामुळे वडगावच्या तहाने इंग्रजांशी लढाई संपली नव्हती. बंगालहून आलेली फौजही पुढे पुढे सरकत येत होती. गव्हर्नर जनरल हेस्टिंग्ज याने फत्तेसिंग गायकवाड आपलासा केला होता. पेशवे ब्राह्मण म्हणून त्यांच्याविरुद्ध पाटीलबाबांनी उठावे म्हणूनही हेस्टिंग्जने खटपट केली.

परिणाम उलटाच झाला. गोदर्दने फारच जलदीने बऱ्हाणपुरच्या रस्त्याने आपली फौज सुरतेस नेली. मराठ्यांच्या अडवणुकीचा कोलदांडा निकामी ठरला! तिकडे झाशी परगण्याकडे पाठविलेल्या राघोबाने, नर्मदेच्या तीरी

चोळीमहेश्वराच्या जवळ, पाटीलबाबांच्या हरिबाबाजी या शिलेदारावर एकाएकी हल्ला करून निसट घेतली ! राघोबादादांचा उंट मग सरळ भडोचला इंग्रजी सैन्यात दाखल झाला. दादा मग इंग्रजी कृपाछत्राखाली सुरक्षित राहिले.

पावसाळा संपला. गोदार्दने रणशिंग फुंकले. पाटीलबाबा महादजी शिंदे अस्तन्या सावरून सामन्यास सरसावले.

गोदार्द तापी उतरून १७८० च्या १८ जानेवारीस डभोई घेऊन बसला. १० फेब्रुवारीला तर त्याने अहमदाबाद वेढले. तेथील ठाणेदाराच्या मराठी फौजेने गोदार्दशी निकराचा सामना दिला. पाच दिवसांनी अहमदाबाद इंग्रजांचे झाले !

पुणेदरबार चिडला. कोकणात परशुराम भाऊ पटवर्धन, घाटमाथ्यावर हरिपंत फडके आणि गुजराथेत शिन्दे-होळकर आपआपल्या आघाड्या उघडावयास रवाना झाले. महादजी व तुकोजी शिंदे मोठ्या फौजांसह कासारवारी उतरून बडोद्यापासून साठ कोसांवर उभे राहिले, शिंदे यांनी सहा हजारांची एक तुकडी महीनदीच्या काठी पाठविली. स्वतः डभोईच्या तळावर सड्या फौजेसह इंग्रजांच्या तोंडावर शिंदे राहिले.

लढाईस तोंड लागले. २ एप्रिल १७८० रोजी एकाएकी भगीरथराव शिंदे आणि पाराजीपंत यांच्या फळ्या फोडून खुद्द महादजींच्या अव्वल टोळीवर गोदर्दने हल्ला चढविला. शिंद्यांनी गोदार्दच्या फौजेभोवतालचा प्रदेश बेचिराख करून शत्रूस दाणावैरणसुद्धा मिळू नये अशी व्यवस्था केली.

पावसाळा संपेपर्यंत गनिमी काव्याच्या झडत्या देखील बेताच्या होत्या. पावसाळ्याच्या शेवटास खुद्द शिंद्यांच्या मुलखावर इंग्रजांची स्वारी झाली. हैदराने मद्रास इलाख्यात इंग्रजांविरुद्ध अनेक जय मिळवले, इंग्रजांनी कोकणात व माळव्यात लढाई सुरू केली. कल्याण सर झाल्यावर गोदर्द वसईचा कबजा करण्यास निघाला. ११ डिसेंबर १७८० ला वसईचा किल्ला इंग्रजांचा झाला. शेवटी पुण्यावर जाण्यासाठी इंग्रज घाट चढले. तुकोजी होळकर, परशुरामभाऊ पटवर्धन इंग्रजांच्या पिछाडीवर रवाना झाले. बोरघाटावर गोदर्दला हरिपंत फडक्यांनी गाठले. तिघांनी गोदर्दची कोंडी केली. तो मुंबईकडे परतू लागला. बंगाल–मद्रासपासून कोकणापर्यंत इंग्रज हैराण झाला

वॉरन् हेस्टिंग्ज सलोख्याचा सल्ला करू लागला. पण तिकडे माळव्यात ४ ऑगस्ट १७८१ रोजी ग्वाल्हेरचा किल्ला इंग्रजांच्या हाती पडला. मग?

मग पाटीलांनी आपला इंगा इंग्रजांस दाखवला. रसद तोडून इंग्रजी सैनिकांची उपासमार तर केलीच पण त्यांच्यावर तोफांचाही मारा सुरू केला. सहा–सात दिवसांत इंग्रजांना पळता भुई थोडी झाली. तेव्हा कोठे हेस्टिंग्जचे डोळे साफ उघडले.

कलकत्याहून पुण्यास अंडरसन आला. इकडे शिंद्याशी म्यूरसाहेबांनी तह आरंभिला. १३ आक्टोबर १७८१ मध्ये तो पार पडला. इंग्रजी फौजेने यमुनेच्या पार जावे व महादजींनी उज्जनीस परतावे; इंग्रजांनी यमुनेच्या पश्चिमेकडील घेतलेला मुलूख शिंद्यास दिला. ग्वाल्हेर गोहदच्या राण्याकडे दिले.

पुण्यास गेलेल्या इंग्रज दूताला पाटीलबाबांशीच तह करण्यास सुचविले. पेशव्यांतर्फे पाटीलबाबा आणि इंग्रजांतर्फे अंडरसन यांच्यामध्ये मग सालबाईचा तह झाला. त्यात ठरले की—

पुरंदरच्या तहानंतर इंग्लिशांनी घेतलेला मुलूख आणि भडोच व त्याखाली इंग्रजांस देऊ केलेला तीन लाखांचा मुलूख हे सर्व मराठ्यांस मिळावे; गुजराथेत व गायकवाडच्या संबंधाने पुरंदर तहापूर्वीप्रमाणे परस्परांचे हक्क होते ते कायम व्हावेत; राघोबादादानी पंचवीस हजार दरमहा घेऊन शिंद्यांच्याकडे रहावे; सरकारच्या राज्यप्रकरणात राघोबानी हात घालू नये व इंग्रजांनी त्यास मदत करू नये.

हा तह १७८२ च्या मेपासून पेशवे दरबारात होता तो २४ फेब्रुवारी १७८३ रोजी कायम झाला.

वा. क्र. 98
विषय. ना. ना.

## दिल्लीची किल्ली

पाटीलबाबा आता घरातल्या शिरजोरांच्या पाठीमागे लागले. माळव्यातल्या ज्या संस्थानिकांनी मराठ्यांविरुद्ध शस्त्र उपसले, त्यांत गोहद, खेची, तरवार, दतिया, चंदेरी वगैरे संस्थानिक आणि मेवाशी, गिराशे, असे लोक होते.

गोहदचा जाट संस्थानिक इंग्रजांच्या वजनदारीने ग्वाल्हेरचा किल्ला दावून बसला होता.

घरचा शिरजोर किंवा माजोर हा कमजोराइतकाच शत्रूची सेवा करतो. म्हणून इंग्रजांचेच अनुकरण करून सालबाई-तहातील ग्वाल्हेरचे कलम बाजूला ठेवून महादजींनी सालबाई, आंत्री, गोहद व ग्वाल्हेर कबजात घेतलेच. जैशास तैसा जेव्हा भेटे । तेव्हा मजालसी थाटे ।। वॉरन हेस्टिंगची छाती झाली नाही महादजीविरुद्ध जीभ वा बोट उचलण्याची.

अनेक युद्धांत युरोपियनांच्या कवाइती सैन्याची कामगिरी पाहून महादजी बाबासही आपले सैन्य कवाइती करण्याची उबळ येई. पण वडगावच्या लढाईपासून त्यांचा तसा निश्चयच झाला. याच सुमारास डिबॉईन नावाचा एक फ्रेंच शिपाई पाटीलबाबांकडे नौकरीसाठी आला. त्याला हजार रुपयांवर पाटीलबाबांनी घेतले. त्याने दोन पलटणी तयार केल्या. तोफखानाही उभा केला. आणि ?

दिल्लीच्या बादशहास ममतेत घेऊन बंदोबस्त आपल्या लगामी लावून घेतल्याने सर्वही घडावयाजोगे आहे, पाटीलबाबांनी मनात आणले. गोहदच्या राण्यास कैद करून ग्वाल्हेरच्या किल्ल्यात ठेवल्यावर आपली फौज ढोलपूर आग्र्याच्या रस्त्याने पाटीलबाबानी चालविली. पाटीलबाबा दिल्लीस गेले व बादशहास भेटले.

बादशहाने पाहिले, पाटीलबाबांच्याशिवाय दुसरा कोणीही वजनदार मसलती, व फौजबंद सरदार हिंदुस्थानात नव्हता. आपणाला १७७१ त पाटीलबाबांनीच दिल्लीस आणले, हेही बादशहा जाणत होता. बादशहाने बाबास वजिरी देऊ केली. बहुमानाच्या पदव्यांपेक्षा शिंद्यांना "पाटीलबाबा" हेच पद फार आवडे. म्हणून 'वकील-इ मुतलिक' हे थोरपद श्रीमंत सवाई माधवरावांकरवी संपादून आपण पेशव्यांच्यातर्फे नायब म्हणून पाटीलबाबांनी दिल्लीचा कारभार हाती घेतला. बादशहाच्या राज्यात गोवधबंद करण्याचा हुकूम शहाअलमकडून पाटीलबाबांनी मिळवला. बादशहाने महादजीस अमीर-उल-उमराव हा किताब दिला. सांप्रदायाप्रमाणे पाच लाख होन पाटीलबाबांनी बादशहास नजर केले.

दरबारातील लुच्चे व बंडखोर लोक दूर करून त्यांच्या जाग्यावर चांगली

माणसे नेमली. बादशहास यावयाच्या खंडणीच्या थकबाक्या वसूल केल्या. दिल्ली येथे अंमल बसताच पाटीलबाबांनी आपल्या फौजेसह पुण्यक्षेत्र मथुरा येथे तळ दिला.

याच १७८५ मध्ये वॉरन हेस्टिंग्ज निजधामास म्हणजे इंग्लंडला गेला. लगेच बंगाल प्रांताबद्दल इंग्रजांकडून यावयाच्या खंडणीची मागणी पाटीलबाबांनी केली. १७८४ व १७८५ ही साले भयंकर दुष्काळाची होती. माणसांचे सांगाडे रस्तोरस्ती आढळत. तेव्हा इंग्रजातर्फे माल्टेटसाहेब पाटीलबावास मथुरेत जाऊन गयावया करीत भेटले. परराष्ट्राबरोबर बोलणे-चालणे करण्याचा आपला अधिकार गाजवून पाटीलबाबांनी इंग्रजांस चिमटीत धरले. दिल्ली म्हणजे हिंदुस्थानच्या इतिहासाची किल्ली. ती पाटीलबाबांच्या बोटाबोटाने फिरू लागल्यावर मराठी मुलखात आनंदीआनंद झाला.

## संत सोयरोबा

दिल्लीची दाढी महादजी शिंदे हलवीत होते. त्यांच्यापर्यंत दक्षिणचा एक संत पोहोचला. त्याला पाहताच महादजींनी रामराम केला. सन्तांचा नाव, गाव, ठावठिकाणा पुसला. कळले की संत सोहिरोबा म्हणतात ते तेच, सावंतवाडी संस्थानातील बांदे गावच्या कुलकर्ण्यांपैकी तो सत्पुरुष. तरीही शिंद्यांनी विचारले—

“ बालराजे खेम सावंत यांचे चुलत्यांनी तुम्हाला कोंडून घालून देव दाखविण्यास फर्माविले होते काय ? ” ‘ हो ’ सोयरोबा आंबिये उत्तरले, “ पण अणुपरमाणूत, माझ्या, तुमच्यात, सर्वांत भरलेला देव मी कसा वेगळा दाखवणार ? मला अंधारात म्हणून कोंडले, पण प्रल्हादासाठी नरसिंह खांबातून प्रगट झाला ना ? तसाच माझ्यासाठी विजेच्या चमकेसारखा लख्ख प्रकाश पडला त्या अंधारात ! खेमसावंतांच्या काकांचे डोळे उघडले, अन् माझी सुटका झाली. ”

शिन्दे आणखी विचारू लागले—“ सोयरोबा, तुम्ही केलेले काव्य तुमची बहीण लिहून ठेवी, हे खरे काय ? ”

" अगदी खरे. "

" सिद्धान्तसंहिता अन् महदनुभवेश्वरी हे ग्रंथ तुमचेच ना ? "

" हो, पाटीलबाबा. "

" तुम्ही आता उत्तरेकडे का वळलात ? " " पाच वर्षांखाली ( सन १७७४ ) साठी उलटली ! म्हटले आता पुण्यक्षेत्रे पहावी व हरी ठेविल तैसे रहावे. म्हणून पाच वर्षे तीर्थक्षेत्रे करीत आलो आहे. " " तुमच्यासारखा संत आता इकडेच राहू दे. आम्ही उज्जनीस तुमची सोय करतो. "

उज्जनीस १७७९ पासून सोयरोबांनी एक तप रहिवास केला. एक दिवशी मनात आले की मठ सोडून जावे ! अन् गेले की ! महादजी शिंद्यांनी शोध शोध शोधले. पण पत्ता नाही ! " आले देवाजीच्या मना । तेथे कोणाचे चालेना ॥ "

## पाटीलबाबांचे नाना ( फडणिसा ) स पत्र

आम्ही श्रीवरील बेलभंडार पाठविला आहे व हे पत्र शपथपूर्वक लिहिले आहे. आपण बंधुत्वाविषयी संशय न मानावा. मशारनिल्हे बोलतील ते आमचे बोलणे जाणावे. ही सरदारी आपली व फडणिशी आमची असा निश्चय झाला. जेथे आपण आहा तेथे मी आहे, हे शपथपूर्वक जाणावे.

## डि बॉइने

काळाची गरज ओळखण्यात महादजी शिंदे चतुर होते. बुंदेलखंडावर स्वारी करण्याचे विचार डोक्यात घोळत होते. त्याच वेळी डि बॉइने या फ्रेंच सैनिकाचा अर्ज त्यांच्या हाती आला. धाडसी, समजूतदार व दूरदर्शी असा हा संघटनपटू शिपाईगडी पक्षपाताच्या अन्यायाने आपल्या स्वाभिमानाला धक्का लागतो म्हणून युरोपियन कंपन्यांची नोकरी सोडून आपल्याकडे येत आहे, असे शिंद्यांना समजले. युरोपियन शिस्तीच्या व शस्त्रांच्या

सैन्याशी यापुढे भारतीयांची गाठ पडणार तेव्हा आपल्याजवळ तोडीस तोड हवी, ही काळाची गरज महादजींच्या लक्षात आली होती. त्यांनी डि बॉइने यास आपल्याकडे घेतले. साडेआठशेची एकेक अशा दोन पल्टणी डि बॉइनने उभारल्या व त्यांना इंग्लिश लष्करी पद्धत लावली.

## पेशव्यांच्या दिल्ली–वकिलाचे पाटीलबाबास पत्र ( १७८३ जून )

नजफखान मेला. प्रस्तुत तेथे बखेडा झाला आहे. अशा समयास आपली स्वारी इकडे आलियास स्वल्प मेहनतीने महत लाभ घडावा, असे आहे. वरकड थोरलाले अमीर-उमराव इच्छा करतात की, पाटीलबावांची स्वारी या वेळी इकडे आल्यास मोठा उपयोग आहे. नाही तर इंग्रज इकडे प्रवेश करतील. मग उपाय चालणार नाही.

## सालबाईचा तह

इंग्रजांचा सेनापती गोदार्द १७८० च्या प्रारंभी तापी उतरून पेशव्यांच्या मुलखात शिरला. फेब्रुवारीत त्याने अहमदाबादला वेढा घातला. शहरात मराठ्यांचे सैन्य होते. तुंबळ झाले. पण पाच दिवसांनी मराठ्यांना अहमदाबाद सोडावे लागले. नर्मदा उतरून महादजी गुजराथेत आले व इंग्रजांशी तडजोड बोलू लागले. गोदार्द निगरगट्ट राहिला. पाटीलबावा त्याच्याशी गनिमी काव्याने लढत होते. लढाईस तोंड लागेना. तेव्हा वॉरन् हेस्टिंग्जला कळवून गोदार्दने माळव्यावर हल्ला करविला.

माळव्यात इंग्रजांनी फार नासधूस केली. 'वरीन्' ठाणी मारली व ग्वाल्हेरचा किल्लाही घेतला. इंग्रजाचा तळ सिरोज येथे होता. महादजींनी भोवतालचा मुलूख बेचिराख केला व इंग्रजांचे दाणापाणी बंद केले. अखेर इंग्रजास पळ काढावा लागला. मग हेस्टिंग्जने मराठ्यांशी तह केला. त्याकामी नाना फडणविसांनी महादजीस सर्वाधिकार दिले. सालबाईचा तह

१३ फेब्रुवारी १७८३ रोजी झाला. त्याअन्वये पुरंदर तहानंतर इंग्रजांनी घेतलेला सर्व मुलूख परत मिळाला. राघोबास दरमहा पंचवीस हजारांची नेमणूक होऊन शिंद्यांच्या संमतीने राघोबा कोठेही राहू देत असे ठरले.

## निराशा शूरांच्या कधी न हृदया स्पर्शहि करी !

दिल्लीच्या बादशहास पाटीलबाबांनी स्थिरासन केले. तेव्हा बादशहाने त्यास वजिरी देण्याचे ठरविले. पण पाटीलबाबा म्हणाले— "छे! मी पेशव्यांचा नोकर. साधा पाटील. मला हा मान न देता माझे धनी सवाई माधवराव यांजला हा मान द्यावा. मी त्यांचा नायब या नात्याने काम करीन."

पाटीलबाबांनी एका धोंड्यात दोन पक्षी मारले.

बादशहाने त्यांस अमीर उल् उमराव ही किताबत देऊन गौरव केला. शिरस्त्याप्रमाणे पाटीलबाबांनी पाच लाख होनांचा नजराणा दिला.

हाती कारभार येताच पाटीलबाबांनी बादशहाच्या खाजगी खर्चाची दरमहा पासष्ट हजारांची तरतूद केली. दरबारातले लबाड व गुंड काढून टाकले. ऐतखाऊ उमरावांच्या जहागिरी खालसा केल्या. रजपुताकडील थकबाक्या १७८६ मध्ये वसूल केल्या. बादशहाकडून गोवधबंदीचे फर्मान काढले.

थकबाक्यांच्या दुसऱ्या हप्त्यांच्या वेळी रजपूत दांडगेपणा करू लागले. तेव्हा महादजी शिंदे राजपुतान्यावर निघाले. ही वार्ता समजताच जयपूरचा राजा प्रतापसिंग व जोधपूरचा महाराज विजयसिंह हे सैन्यासह एकत्र आले. उदेपूरकर त्यांना मिळाले. चारशे तोफा व एक लाख सैन्य एकत्र झाले. सन १७८७ च्या मे महिन्यात जयपूरपासून चाळीस मैलांवर असलेल्या लालसोट येथील मैदानावर सामना उभा राहिला. पाटीलबाबांचा डि बॉईन व्यूह रचू लागला.

रजपुतांनी दहा हजार सैन्यानिशी मराठ्यांवर हल्ला केला. डिबॉईन

कवायती सैन्यापुढे रजपूत बाजारबुणगे ठरले. या वेळी दिल्लीच्या बादशाही सैन्याने दगा दिला. ते रजपुतांच्या बाजूने लढले. कारण दिल्लीचा बादशहा व्यवहारतः पाटीलबाबा महादजी शिंदे झाला, हे त्या सैन्याला खपत नव्हते.

रजपुतांनी जिंकली. पाटीलबाबा परतले. त्यांनी आग्रा, अलिगड ही ठाणी मजबूत केली. जाटांना दीग किल्ला देऊ करून त्यांचा स्नेह जोडला. मोगल बादशाही सैन्य फितूर करणारा राजा दयाराम यास पकडून आणून हत्तीच्या पायी दिले. "इंग्रज लोक रजपुतांशी व बादशहाशी संधान बांधणार आहेत आणि तसे झाल्याने इंग्रजांचा अंमल हिंदुस्थानात वाढून मराठ्यांना लोक पाण्यात पाहतील," असे पुण्यास कळवून पाटीबाबांनी कुमक मागितली.

महादजी चमेली उतरून घोलपूर येथे आपली सैन्यभरती करीत होते. तेथे मराठ्यांची पुण्याहून आलेली कुमक मिळाली.

मग फितूर बादशाही सैन्यास व त्याचा सेनापती इस्माईल बेग यास हात दाखवणे सोपे गेले. फितुरांचा पराभव राणाखान प्रभृतींनी केला.

महादजींनी आग्र्याचा पक्का बंदोबस्त करून मथुराक्षेत्री ठाण मांडले. १९ जुलै १७८८ रोजी बादशहा अलम यास गुलाम कादरने पैशाची मागणी केली. बादशहा म्हणाला– "खजिन्यात पैसा नाही व शिंद्यांशी लढाई करणे इष्ट नाही."

गुलाम कादरने बादशहास सिंहासनावरून खाली ओढून लाथा घातल्या व बेदरखानास गादीवर बसविले. शहाअलम बादशहाची मुलासकट बंदीवासात रवानगी झाली.

ऑगस्ट १७८८ मध्ये मराठ्यांचे सैन्य दिल्लीजवळ आले. ते लाल किल्ल्यात घुसले. कारागृह रिकामे केले. शहरात शांतता प्रस्थापित केली. मराठ्यांनी मिरत किल्ला वेढला. ती झुंज दोन महिने चालली. शेवटी गुलाम कादरला राणाखानाने पकडले व मथुरेस पाटीलबाबांच्या पुढे उभे केले. पाटीलबाबांनी त्याला गाढवावर उलटा बसवून सर्व मथुरेत त्याची धिंड काढली. तो शिव्या देऊ लागताच त्याची जीभही हासडली.

पाटीलबाबा महादजी शिंद्यांचा अंमल कायम झाला.

## थोरांची आदब पोरखेळ नव्हे !

होळीचा होता सण. अद्वातद्वा वाचाळपणा, खेळ, रंग, कुस्त्यांचे फड, नाच या सगळ्या गोष्टींना म्हणजे त्या सणात उधाण यावयाचे. चेष्टा, माकड-चेष्टा, नकला यांचा नुसता धुमाकूळ व्हायचा. सन १७८९ च्या होळीत एक अपूर्व गंमत झाली. आनंदराव नरसिंह या नावाच्या मराठा सरदाराला एकदम हुक्की आली " दिल्लीश्वरो वा जगदीश्वरो वा " असलेल्या शहाअलम् बादशहाचे सोंग काढण्याची !

ते सोंग पाहून लोक मनापासून हसले व रमले. आपली स्वतःची थट्टा बादशहा अलमने पाहिली. खूष झाली स्वारी ! बादशहाने आनंदराव नर-सिंहाला जवळ बोलावले, पाठीवरून हात फिरविला. नकलेतील वरिष्ठ व दर्शक कलेबद्दल कौतुक केले ! आनंदराव नरासिंहाला बक्षीसही दिले. मातबर दीलदारी ही अशी असते.

पण पाटीलबाबांचे माथेच फिरले होते. अनुभविक, म्हातारी माणसे, विद्वान, कर्तबगार, आणि मायमाउली यांचा कोणीही, केव्हाही, कसलाही चुकूनसुद्धा अवमान करू नये, असे पाटीलबाबांचे मत होते.

लोकांचे परमाणुतुल्य गुण जे मेरुपरी वानिती ।
चित्ती तोषही पावती सुजन ते, नेणो किती नांदती ॥

त्यापैकी शहाअलम असेल. पण दुसऱ्याच्या सज्जनपणाचा फायदा किती घ्यायचा ? म्हणून पाटीलबाबांनी आनंदराव नरसिंहाचे कान मोडले; त्याचा गोट लुटला, त्याला साफ केला आणि आपल्या नौकरीतून घालवून दिले.

न कळत पद अग्निवरी पडे ।
न करि दाह असे न कधी घडे ॥

हे पाटीलबाबांच्या कडक शिस्तीचे सूत्र होते.

## भाइ राणेखान कोठे आहेस तू ?

महादजी शिंद्यांना पानपताहून सुखरूप आणणारा हा शिंद्यांचा मानस-भाऊ. दोघांचा जिव्हाळा इतका की राणेखान हाच महादजींचा सल्लागार.

नाना फडणिसासारखे मुत्सद्दी महादजीपुढे "अर्धे शहाणे" ठरले की, राणेखानच्या मध्यस्थीनेच सगळे काही जुळून यायचे! पानिपतानंतर दहा वर्षांतच राणेखान शिंद्यांचा प्रसिद्ध सरदार झाला होता. त्याला देवपूरचा इनामदार वंशपरंपरेने करण्यात आले होते.

आपण मूळचे नागीर येथे राहणारे; मराठ्यांच्या फौजेत चाकरी धरण्या-अगोदर उदेपुरी राण्याकडे आपण काही दिवस शिपाईगिरी केली होती. पण तेथे आपल्या गुणाची चहा होती कोठे? महादजींनी आपल्याला एकदा भाऊ म्हटल्यावर अगदी तश्शा जिव्हाळ्याने वागवले. म्हणून राणेखान कृतज्ञ होता. महादजी तर पानिपतापासूनच तसे होते.

महादजींचा हा जिव्हाळ्याचा भाऊ १७९१ साली अल्लाहने आपल्या घरी नेला आणि महादजींना आपल्या मस्तकीची एक शीर तुटल्यासारखेच झाले. ते अधूनमधून एकान्तात हळहळू लागले—"भाई राणेखान, कोठे आहेस तू?"

## अलिजा बहाद्दूर शिंदे

पाटीलबाबा महादजी शिंदे मथुरेहून बादशहाच्या भेटीस गेले. बादशहास आनंद झाला. बादशहाच्या खर्चासाठी पाटीलबाबांनी वर्षास आता नऊ लक्ष रुपये द्यावयाचे असे ठरविले. त्यावर बादशहाने महादजीस—

"यार वफ्तदार, सीपेसाकर, रस्तुमे हिंद, महादजी शिंदे फर्जंद, अर्जमंद, महादजी शिंदे अलिजांबहाद्दूर मुजफरजंग"

याप्रमाणे करामतीची किताबत दिली.

बादशाही सत्ता मावळली. मराठ्यांचा यशोदुंदुभी गाजू लागला. महादजींनी दिल्लीची बादशाही आपल्या हुकमतीखाली आणली. याचा आनंद पुणे दरबारास फार.

पाटीलबाबांनी लालसोटच्या पराभवाचा वचपा काढण्याचे ठरविले. जयाप्पा शिंद्यांनो जयपूरकरांनी विश्वासघाताने मारले, त्याबद्दल 'मुंडकटाई' म्हणून जयपूरकराकडून महादजींनी अजमीर महाल हस्तगत केला होता,

तो लालसोटच्या लढाईत गमावला. ते शल्य काढावयास हवे होते. २० जून १७९० ला पाटण्याला सैन्ये भिडली. डिबॉईनच्या सैन्याने शर्थ केली. मराठे सरदारांनी लांडगेतोड आरंभली. शत्रूकडील बारा हजार लोक मराठ्यांनी युद्धकैदी केले. हत्ती, घोडे, उंट यांची लूटही आणली. पाटणा काबीज केले व तेथील राजास गिरफदार करून आणले. पाटण्याच्या विजयानंतर मराठ्यांनी सादर, रूपनगड वगैरे किल्ले जिंकले. जयपूर किल्ल्यास वेढा दिला. आणि नंतर मिर्ताच्या मैदानावर दोन्ही—मराठे व रजपूत—भिडले रजपुतांचे प्रमुख गंगाराम त्रिनधारी व भीमराज शिगवी. मराठी सैन्य डिबॉइनच्या पलटणीनिशी लूना नदी उतरून तोफांचा मारा करू लागले. चार हजार राठोडांनी मराठ्यांवर हल्ला केला. गोपाळराव भाऊ पटवर्धन व जीवबा दादा बक्षी यांच्यावर ते तुटून पडले.

दुसऱ्या दिवशी म्हणजे ११ जुलै १७९० ला मराठ्यांनी मिर्ता शहर कबजात घेतले. अमाप लूट मिळाली. गंगाराम बिनधारी पाडाव झाला. विजयसिंग सर्वस्वी हरला. तह झाला. अजमीर, पुष्कर ही ठिकाणे व साठ लक्ष रुपये मराठ्यांना मिळाले. लखबादादास अजमीरचा सुभेदार नेमून महादजी पाटील मथुरेस गेले.

तेथून हिंदुस्थानातील आपल्या राज्याचा नीट बंदोबस्त पाटीलबावांनी केला. मग दिल्लीस जाऊन दक्षिणेस जाण्याची त्यांनी बादशहाची परवानगी घेतली. बादशहा शहाअलमने पूर्वीच्या सर्व सनदा कायम करून पेशवे व शिंदे यास दिलेले अधिकार वंशपरंपरा बहाल केले. या वैभवसंपन्नतेने पाटील बाबा पुण्यास येण्यास निघाले. बारा वर्षांनी ते पुण्यास येत होते.

## लष्करी सलामी !

महादजी पंढरपूरहून पुण्यास दाखल झाले. ११ जून १७९२ ही तारीख होती ती. संगमावर त्यांना भेटण्यासाठी श्रीमंत सवाई माधवराव, नाना फडणीस, हरिपंत फडके सामोरे गेले. मुळामुठा नद्यांना आणि महादजींना आनंद झाला. त्यांनी आपल्या फौजेकडून पेशव्यांस सलामी करवली.

मदादजींनी आपली फौज दुरस्ता फऱ्याने उभी केली. एक तर्फेने घोडदळ उभे राहिले. त्यात पागे, शिलेदार अन् पठाण हुजरात शिंदे यांची सलामी झाली. दुसऱ्या तर्फेने चार कंपू उभे केले. त्यामध्ये तोफा उभ्या राहिल्या, बैल तोफेस जुंपलेले. असा तो सरंजाम, त्या वेळी शिंदे यांच्या दौलतीची वर्णना करण्यासारखीच होती.

घोडेस्वारांचे डोक्यास मंदील, अंगात झगा, अंगावर शालजोडी, हातात शालनाम्याचा रुमाल, पायात किनखापी विजारी, बन्दुका बांधून मुजऱ्यासाठी सारे उभे, हातात सोन्याची कडी, गळ्यात कंठी, कानात चौकडे असे स्वार, भालेकरी, आडहत्यारी व करोले उभे राहिले. तसेच हत्ती उभे. हत्तीवर अंबारी. त्या थाटाला साजेल असाच कोतवाल घोड्यांचा फरा !

सरकारची स्वारी मुजरा घेत चालली. दुतर्फा मुजरे होऊ लागले. दोन कोसपर्यंत मुजरे झाले. तोफा सोडायची व कवायत करण्याची आज्ञा होण्याचा अवकाश ! कंपूंची कवायत व तोफेचे आवाज सुटलेच ! श्रीमंतांची मर्जी प्रसन्न झाली. बाराशे तोफांचे आवाज एकसाथ होते ते !

स्वारी वाड्यात जावयास निघाली. महादजी शिंदे आपल्या वानवडीच्या तळावर गेले.

## पारंब्यांची झेप

बादशहाकडून आणलेल्या सनदा पेशव्यांना अर्पण करण्याचा समारंभ वानवडी येथे शिंद्यांच्या तळावर करण्याचे ठरले. तेथे मोठमोठे शोभिवंत डेरे उभारून बैठकीस मौल्यवान गालिचे घातले होते. मखमालीचे रुजामे घालून बैठक अत्यंत शोभिवंत करण्यात आली होती. दरबारच्या मध्यभागी बादशहांचे उच्च सिंहासन उभारले होते. उजव्या बाजूस पेशव्यासाठी तख्त तयार केले होते.

सगळी तयारी झाल्यावर पाटीलबाबा आपल्या अलिजाबहादूरी लव्याजम्यासह पेशव्यांस बोलावण्यासाठी गेले.

पेशव्यांची स्वारी तयार होऊन अलंकारांनी सजविलेल्या हत्तीच्या अंबारीत बसली. त्यांच्यामागे नाना फडणिसांचा हत्ती. त्यामागे हुजरातीचे सेनापती हरिपंत तात्या फडके व महादजी शिंदे यांचे हत्ती होते. त्यांच्या मागे एकंदर थोर मुत्सद्दी, त्यांच्याही मागे हुजरातीचे व इतर सरदारांचे सैन्य चालत होते. जरीपटक्याचे आणि जिलीबीचे शृंगारलेले हत्ती, कोतवाली घोडे यांची पथके मागे होती. बरोबर डंके, नौबती, सनया मागे पुढे वाजत. शेकडो भालदार, चोपदार ललकारत होते.

रस्त्याच्या दोन्ही बाजूंस हजारो प्रेक्षक जयजयकार करीत होते. श्रीमंतांची स्वारी तिसऱ्या प्रहरी वानवडीस पोहोचली. दरबारात शिरताच बादशहाच्या सिंहासनास वंदन करून रिवाजाप्रमाणे पुढे नजराणा ठेवून पेशवे तख्तावर बसले. नृत्यगायनादि कार्यक्रम झाल्यावर पाटीलबाबांनी विनंती केली की– "बादशहा शहाअलम् यांनी संतोषित होऊन दिलेले फर्मान स्वीकारावे." नंतर त्यांनी पेशव्यांपुढे बादशहांनी पाठविलेली नऊ वस्त्रे व अलंकार ठेवले. ते घालण्यासाठी पेशवे जवळच्या तंबूत गेले. पोशाख घालून बाहेर पडणार, तोच पाटीलबाबांनी खाकेतून आणलेला बादशाही जोडा श्रीमंतांपुढे ठेवला.

दिल्लीच्या बादशहाची कुलमुखत्यारी ( वकील-इ-मुतलक ) घेऊन पाटील-बाबा महादजी शिंदे पुण्यास आले होते. पाटीलबाबांनी जोडे पुढे ठेवताच श्रीमंतांनी त्याबद्दल नापसंती दाखवली. तेव्हा उत्तरचा धाक पाटीलबाबा बोलला—

"श्रीमंतांच्या आधाराने आम्हाला सारे लाभले. जमिनीवरले अंबारीत चढलो. वड कितीही वाढला तरी त्याच्या पारंब्याची झेप नम्रपणाने मूळ बीजाच्या दिशेनेच लवावयाची."

श्रीमंत निरुत्तर झाले. पेशवे दरबारात बसल्यावर पारसनीसाने बादशहाचे फर्मान, वकील-इ-मुतालक व गोवधबंदीची सनद वाचून दाखवली. नंतर बादशहाने पाठविलेल्या अनेक वस्तु, मानमरात व पालखी-नालखी, राजचिन्हे, हत्ती, घोडे, वगैरे पेशव्यांस नजर करण्यात आले. त्या वेळी वाद्यांचा गजर शेकडो तोफांचे आवाज, पानसुपारी, अत्तर, गुलाल होऊन श्रीमंताचा जयजयकार झाला.

रात्र झाली. हजारो मशाली, हत्तीवरून लावलेल्या चंद्रज्योतींच्या प्रकाशात श्रीमंतांची मिरवणूक निघाली. श्रीमंत पालखीत होते. शनिवारवाड्यात दरबाऱ्यांचे मुजरे झाले. श्रीमंतांनी पाटीलबाबास वजिरातीच्या नायबगिरीची वस्त्रे दिली. बादशहाने दिलेला "राजे महाराज माधवराव शिंदे मदार उलमहा" हा किताब, तशीच वस्त्रे, हत्ती, घोडे, पालखीनालखी अर्पण केली. प्रभाकर शाहीर म्हणतो :–

**मुगुटमणी ते पाटिलबाबा । कोठवर त्यांचा प्रताप झाला ।**
**दर्शनमात्रे तापचि जावा । नवस नवसिता फळास यावा ।**
**हरहमेशा शत्रूशी दावा । माहित सगळा मराठी कावा ।**
**हुशार फौजा लढाईला वा । जिंकुनि हिंदुस्थान परतले ।।**
**धन्य धनी आणि धन्य दास ते ।। १ ।।**

स्वतंत्र मराठेशाहीतील हा शेवटचा उत्सव !!!

## युक्ती नसता विटंबना !

महादजी शिंदे पुण्यास आले, ते पायाने लुळे होते. सोनपत-पानपतच्या लढाईपासून त्यांना ते व्यंग होते.

दुसरे दिवशी श्रीमंत पेशवे पर्वतीदर्शनास हत्तीवरून जावयाचे व बाकीच्यांनी चालत जावयाचे ठरले. आपल्या लुळेपणामुळे आपण मंडळी-बरोबर कसे जाणार ही चिंता महादजींस पडली. सर्व मंडळी चालत असता आपण घोड्यावर बसावे तर व्यवहार सुटतो. चालत जावे, तर बाकीच्यांच्या बरोबर चालवणार नाही ! मागे पडलो तर हसे व्हावयाचे !!!

तेव्हा शिंद्यांनी शक्कल लढवली. विचार केला की आपण प्रथम कसे आलो पेशवेदरबारी ? हुजरे म्हणून ! मग तीच भूमिका उद्या सांभाळावी.

श्रीमंत पर्वतीला जाण्यासाठी हत्तीवरील अंबारीत बसण्यासाठी निघाले, त्यांनी काढून ठेवलेले जोडे घेऊन पेशव्यांच्या पाठोपाठ अंबारीत चढले व पेशव्यांच्या पाठीमागे बसले.

महादजींची फजिती होईल अशी अपेक्षा असणाऱ्या चटोरांची तोंडे मग चोरट्या चिमणीएवढी झाली ! !

## श्रीमंतांचा शब्द शिंद्यांना शिरसामान्य

पुण्याचा कारभार, जमेल तर, आपल्या हाती हवा म्हणून पाटीलबाबा फौजेसह वानवडीस तळ देऊन राहिले. एके दोनप्रहरी हरिपंततात्या फडके सड्या स्वारीने पाटीलबावास भेटण्यास आले.

त्यांचे स्वागत झाले. पाटीलबाबा म्हणाले– " तात्या, का येणं केलं ? अन् एवढे उदास का ? "

तात्या :– अहो पाटीलबोवा, तुम्हीच आता सरकारचा कारभार पहावा, हे बरे ! नानानी व मी कारभारात नसावे. आम्ही उभयता सरकारचे अपराधी. म्हणून तुझ्यापाशी आलो. काय पारिपत्य करावयाचे असेल, ते करावे. श्रीमंतांचे राज्य निर्विघ्नपणे चालले म्हणजे झाले !

पाटीलबाबा :– अन् तुम्ही दोघे कोठे जाणार ?

तात्या :– काशीयात्रेला !

पाटीलबावा :– वेड का काय ? श्रीमंतांनीच सांगितले आहे की ' नाना ( फडणीस ) माझा उजवा हात व डावा पाटीलबाबा. यातला कोणताही हात कमी झाला तर मी थोटा होणार. ' म्हणून आहे ही व्यवस्थाच पुढे चालावी अन् तात्या, तुम्ही नाही तर इथे मने सांधणार कोण ?

तात्या :– श्रीमंतांचे हे बोलणे केव्हाचे ?

पाटीलबाबा :– काल पर्वतीवरून परत येताना हिराबागेच्या मागील तलावात नाव चालू असताना, श्रीमंतांनी शिंद्यांना हाती धरले. शिंदे श्रीमंतांचा शब्द मोडणार नाहीत.

## मनोरा कोसळला

अलिजाबहादर पाटीलबाबा महादजी शिंदे १७९४ च्या फेब्रुवारीत

एकाएकी आजारी पडले. त्यांचा ताप नवज्वरांवर गेला. १२ फेब्रुवारी म्हणजे माघ शु।। १३ शके १७९४ रोजी दुपारी पाच वाजता मराठेशाहीचा हा मनोरा एकाएकी कोसळला. परमोत्कर्षाला चढलेली मराठेशाहीची कर्तबगारीच कोसळली म्हणा ना !

पाटीलबावा महादजी शिंद्यांना औरस पुत्र नव्हता. म्हणून त्यांनी आपला पुतण्या दौलतराव यास आपला पुत्र केला होता. त्यांना एक कन्या होती. ती बाळाबाई शितोळे घराण्यात दिली होती. पाटीलबावांची समाधी वानवडीस झाली. तिची व्यवस्था ग्वाल्हेरच्या "फकीर दौलती" ने पत्करली.

दिवसामागून दिवस चालले. पाटीलबावांचा जिव्हाळा पुढेही सांभाळला जावा म्हणून नाना फडणवीस दक्ष होते.

## पाटीलबावाविषयी सर जॉन शोअरचा खलिता

( कलकत्ता ७ एप्रिल १७९४ )

शिंद्यांच्या स्वभावाचे मुख्य लक्षण त्यांची महत्त्वाकांक्षा, तिच्या जोडीस धूर्तपणा, दीर्घोद्योग व निर्भयवृत्ती. या गुणांनी त्यास सर्वत्र यश आले. थोड्याच वर्षांत गोहद, आग्रा, दिल्ली हे प्रांत, मीरतचा काही भाग व दुआबातील गुलाम कादरची ठाणीही शिंद्यांनी आपल्या राज्यास जोडली. जयपूर, जोधपूरचे राजे त्यास खंडणी देऊ लागले व नजरफखानादी मोंगल मुत्सद्यांनी जे मुसलमानी वर्चस्व दिल्लीस पुन्हा उभे केले होते ते त्यांनी कधी युक्तीने जर कधी जबरदस्तीने मोडून काढले. वझीरास कंपनीचा पाठिंबा होता म्हणूनच काय तो वाचला........

महादजींच्या स्वभावाचे मी केलेले चित्रण बरोबर असेल तर (ईस्ट इंडिया ) कंपनीला त्यांच्या मृत्यूबद्दल वाईट वाटण्याचे काहीच कारण नाही. अनेक कारणांनी त्यांचे व कंपनीचे संबंध चांगले टिकून राहिले होते. एक तर आपण त्यांच्या दिल्लीच्या भानगडीत पडणार नाही हे त्यास पक्के ठाऊक

होते. आपल्या शब्दावर त्यांचा पूर्ण भरवसा होता. व आपल्या मैत्रीने पुणेदरबारी व उत्तरेकडील सत्ताधीशांमध्ये दबदबा बसविण्यास त्यास मदत होई, हेही त्यास पक्के माहीत होते.

पण महत्त्वाकांक्षा मैत्री जाणत नाही. कदाचित याच महत्त्वाकांक्षेच्या पायी त्यांनी इंग्रजांची मैत्री तोडलीही नसती ! पण या मैत्रीला गुप्तपणे सुरुंग लावावयासही ते कचरले नसते ! ! नुकतीच निजामाच्या हातून पुण्याकडील जी खरीखोटी बातमी आली, तिजवरून शिंद्यांनीही मृत्यूपूर्वी काढलेले उद्गार माझ्या विधानाशी विसंगत नाहीत.

## नाना-फडणिसांचे पत्र

( १७९४ डिसेंबर )

राजश्री दौलतराव शिंदे गोसावी यांसी—

६ सकलगुणालंकरण अखंडित लक्ष्मीअलंकृत राजयास स्नेहांकित जनार्दन आशीर्वाद विशेष. उपर येथील कुशल जाणोन स्वकीय लिहीत कै. महादजी पाटीलबाबा यासी आम्ही पत्रात शपथ लेखून दिल्हे सरदारी माझी व फडणिशी आपली. बन्धुत्वाप्रमाणे परस्परे चालावे. हल्ली आपणासी करार असा की सरदारी आमची व फडणिशी आपली. जे आपले आमचे ते आपले असावे. यात कोणीही कसेही अंतर पडावयास सांगितल्यास त्याचे ऐकणार नाही. यात अंतर करू तर येविषयी बेलभंडार आहे.

BVBK-0400016
मं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
१६ दिनांक
विषय. ना. वा.